


दैनिक
अचूक वेध,अचूक बातमी
# अक्षराज
संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध

वर्ष : ०४, अंक : ९०
पाने : ०४, किंमत : ०३ रुपये
संपादक : विनोद कैलास गोरे
RNI NO. : MAHMAR/2022/82056
Follow Us On : www.aksharaj.com
Email : newsaksharaj2021@gmail.com

बुलडाणा, मंगळवार, दि.१२ नोव्हेंबर २०२४

# राज्यात गुलाबी थंडीची चाहूल, मात्र...

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.११, नागपूर :** राज्याच्या बहूतांश जिल्ह्यातील कमाल आणि किमान तापमानाचा पारा घसरला आहे. राज्यात थंडीची चाहूल लागल्याचे संकेत या घसरणाऱ्या तापमानाच्या पाऱ्याने दिले आहेत. तर येत्या काही दिवसात राज्यात थंडीचा जोर वाढण्याचा अंदाज भारतीय हवामान खात्याने दिला आहे.

थंडीने यंदा चांगलीच प्रतिक्षा करायला लावली. मोसमी पावसाचे आगमन आणि परतीचा प्रवास वेळेत झाला असला तरीही अवकाळी पावसाने थंडीचे तर जळगाव, सांगली, नागपूर या जिल्ह्यात देखील तापमानात बऱ्याच प्रमाणात घट झाली आहे.

तापमानाचा पारा घसल्याने हुडहुडी वाढली आहे. दरम्यान, हवामान खात्याच्या अंदाजानुसार पुडील काही दिवस राज्यातील हवामान कोरडे राहील. तर पुढील चार दिवस विदर्भ आणि मराठवाड्यामध्ये काही ठिकाणी



ढगाळ वातावरण राहण्याची शक्यता आहे. १५ नोव्हेंबरनंतर संपूर्ण राज्यात थंडी पडण्याची शक्यता आहे. विदर्भ आणि उत्तर महाराष्ट्रात रात्री व पहाटेच्या हवेत गारवा जाणवत आहे. त्यामुळे गुलाबी थंडीची चाहूल लागली असली तरीही हुडहुडी भरवणाऱ्या थंडीची मात्र प्रतिक्षाच आहे.

राज्यात पुण्यातील किमान तापमानात वेगाने घसरण होत आहे. त्यामुळे पुणेकर थंडी अनुभवत आहेत. या तापमानात आणखी घसरण होण्याची शक्यता हवामान खात्याने वर्तवली आहे. मराठवाड्यात देखील चांगलीच थंडी जाणवू लागली आहे. येथेही किमान तापमान १५ अंश सेल्सिअसच्या आसपास आहे. कोकण विभाग आणि विदर्भातील हवामान मात्र पुढील काही दिवस कोरडेच असणार आहे. दरम्यान विदर्भाची राजधानी आणि महाराष्ट्राची उपराजधानी असलेल्या नागपूर शहरात कालपासून ढगाळ वातावरण आहे.

येथेही कमाल तापमान ३२ अंश सेल्सिअसच्या जवळ तर किमान तापमान १८ अंश सेल्सिअसच्या जवळपास आहे. राज्यातील नाशिक आणि छत्रपती संभाजीनगर या जिल्ह्यांमध्ये देखील किमान तापमानात सर्वाधिक घट नोंदविण्यात आली आहे. गणित बिघडवले. परिणामी पावसाळ्यानंतरही नागरिकांना उकाडा सहन करावा लागला. त्यामुळे उकाड्याने हैराण झालेले नागरिक थंडीची वाट पाहात होते, पण ही प्रतिक्षा आता लवकरच संपणार आहे. राज्यातील नाशिक आणि पुणे जिल्ह्यातील तापमानात सर्वाधिक घसरण झाली आहे.

त्यामुळे याठिकाणी थंडीचा जोर वाढण्याची शक्यता आहे. त्यामुळे याठिकाणी हुडहुडी भरवणारी थंडी नागरिकांना लवकरच अनुभवायला मिळेल. तर हवामान खात्याने दिलेल्या अंदाजानुसार १५ नोव्हेंबरपासून थंडीत वाढ होणार असल्याने हुडहुडी भरवणारी थंडीसाठी आणखी काही दिवस प्रतिक्षा करावी लागणार आहे. दरम्यान या बदललेल्या वातावरणामुळे सर्दीसारख्या आजारात वाढ झालेली आहे.

# शिवसेनेत गद्दारी करण्याचे काम पाटणच्या जिराफाने केले - खा. संजय राऊत

**अक्षराज : सुरेश संकपाळ**

**दि, ११, नवी मुंबई :** शिवसेनेत गद्दारी करण्याचे काम पाटणच्या जिराफाने केले. लोकनेते बाळासाहेब देसाई ताटकण्याचा माणूस होता. मुंबईत पाटणचा माणूस स्वाभिमानाने राहावा याचा विचार ते करत. परंतु त्यांच्या नातवाने शेण खाल्लं. राज्यात परिवर्तन करायचं जनतेने ठरवलं आहे. पाटणला कोयना विभागात ११ डिसेंबरला भूकंप झाला होता. आता २३ तारखेला पाटणला दुसरा भूकंप होणार आहे. राज्यात सगळ्यात जास्त भ्रष्ट खातं शंभूराज देसाई याचं आहे. अशी सडकून टीका खा. संजय राऊत यांनी केली.

नवी मुंबई कोपरखैरणे येथे पाटण विधानसभा मतदारसंघातील शिवसैनिकांच्या निर्धार मेळाव्यात ते बोलत होते. याप्रसंगी राष्ट्रीय काँग्रेसचे जिल्हा सरचिटणीस नरेश देसाई, उपजिल्हा प्रमुख रविंद्र पाटील, तालुकाप्रमुख सचिन आचरे, सुरेश पाटील, सतीश



काळगावकर, संजय संकपाळ, रामचंद्र पवार आदींसह मुंबईतील रहिवासी शिवसैनिक उपस्थित होते.

खा.संजय राऊत पुढे म्हणाले पाटणच्या मतदारांना मस्का लावायला विद्यमान मंत्री मुंबईत फिरतायत. पाच वर्षातून एकदा ते या ठिकाणी येतात. त्यानंतर तुमची त्यांना आठवण येत नाही. शिवसेनेची परंपरा आहे. आमचा फाटकाच मुलगा गद्दाराला पाडेल. नारायण राणे यांनाही वैभव नाईक यांनी पाडले. तोच इतिहास पाटण विधानसभा मतदारसंघात घडेल. मुंबईत कोकण आणि साताऱ्यातील शिवसैनिकांनी शिवसेना टिकवली. पाटण विधानसभा मतदारसंघात पाटणकर आणि देसाई या घराण्यातच आजपर्यंत सत्ता राहिली. शंभूराज देसाई आणि सत्यजित पाटणकर पाटणच्या जनतेला आपली शेवटची निवडणूक असल्याची भावनिक साद घालत आहेत. खरंच, या दोघांची शेवटची निवडणूक असून आता यापुढे शिवसेनेचे हर्षद कदम पुढील पंचवीस वर्ष पाटणमधून हटणार नाहीत. असा विश्वास शिवसेना खासदार संजय राऊत यांनी व्यक्त केला.

हर्षद कदम म्हणाले, पाटण विधानसभा मतदारसंघात सध्या मोठ्या प्रमाणावर भ्रष्टाचार बोकाळला आहे. स्वातंत्र्यानंतर देसाई आणि पाटणकर या दोन घराण्यातच सत्ता कायम राहिली आहे. तरीसुद्धा मुंबईत आज ही मोठ्या प्रमाणावर पाटणमधील रहिवाशी कामाला येत आहे. दोन्ही घराण्याने केवळ स्वतःची घरे भरली. मात्र जनतेसाठी कोणतेही ठोस काम केले नाही.

# सरकार बदलल्याशिवाय शांत बसणार नाही : शरद पवार

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.११, शेवगाव (अहिल्यानगर) :** हे सरकार बदलल्याशिवाय मी म्हतारा होणार नाही आणि शांतही बसणार नाही. असे वक्तव्य राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यांनी केले आहे. संपूर्ण देशाच्या भुकेचा प्रश्न सोडवणार्या बळीराजावर आत्महत्येची वेळ आली आहे. केंद्र सरकारमध्ये सत्तेत असताना या प्रश्नाची कारणमिमांसा करून शेतकर्यांना आर्थिक अडचणीत लोटणार्या कर्जबाजारीपणावर उपाय म्हणून पंतप्रधान मनमोहन सिंग यांच्या सरकारमध्ये आपण ७० हजार कोटींची ऐतिहासीक कर्जमाफी मिळवून दिली.

आज राज्यातील परिस्थिती भयावह आहे. सोयाबीन, कापूस, ऊस उत्पादक शेतकर्यांना खर्चाच्या तुलनेत उत्पन्न पदरात पडत नाही. सरकारचे कृषीविषयक धोरण उद्योग धार्जिणे आहे. त्यामुळे शेतकर्यांवर ही वेळ आली आहे, असे प्रतिपादन माजी केंद्रीय मंत्री व ज्येष्ठ नेते शरदचंद्र पवार यांनी केले. शेवगाव येथे ते बोलत होते.

पवार म्हणाले, राज्यातील कष्टकरी, शेतकरी यांच्यादृष्टीने आशादायक चित्र निर्माण करण्यासाठी व युवकांच्या हाताला काम मिळवून देण्यासाठी म



हाविकास आघाडी वचनबध्द आहे. आठ महिन्याच्या काळात राज्यातील ९०० महिला भगिनींवर अत्याचाराच्या घटना घडल्या आहेत. छत्रपती शिवाजी महाराज व फुले, शाहू, आंबेडकरांच्या राज्यात हे अत्याचार सहन करणे अशक्य आहे. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी देशाला दिलेली राज्यघटना बदलण्याचा प्रयत्न तुम्ही सर्वांनी लोकसभेत हाणून पाडला. लोकसभा निवडणुकीत मोदींनी दिलेला चारशे पार जागांचा नारा महाराष्ट्रात ४८ पैकी ३१ खासदार त्यांच्या विरोधात देवून केंद्रातील सरकारवर अंकुश ठेवण्याचे काम केले.

आता विधानसभेत सत्ता परिवर्तनाची गरज आहे. ते करुन जागरुक मतदार असल्याचे दाखवून द्या, असे आवाहन त्यांनी केले. कांगो म्हणाले, आपल्या सर्वांना राज्यावर आलेले संकट दूर करायचे आहे. देशातील नागरिकांचे दरडोई उत्पन्न घटले आहे. शेतीमाल भाव नसल्याने शेतकरी आर्थिक अडचणीत सापडला आहे.

देशाला व राज्याला आर्थिक अधोगतीकडे नेणाऱ्या एका मोठ्या राजकीय षडयंत्राचे आपण बळी आहोत. महाराष्ट्राची अस्मिता असलेल्या मुंबईचे आर्थिक महत्त्व कमी करून ते अहमदाबाद व गुजरातकडे वळून मराठी माणसाचे खच्चीकरण करण्याचे काम ही राज्यातील आणि केंद्रातील सरकारे करत आहेत, असा आरोप त्यांनी केला.

## पुण्यात डेंग्यू, चिकुनगुन्याचा ताप अचानक कमी

**दि.११, पुणे :** शहरातील डेंग्यू आणि चिकुनगुन्याचा कहर कमी झाला आहे. शहरात जुलैपासून वाढत गेलेली या आजारांची रुग्णसंख्या नोव्हेंबर महिन्यात मोठ्या प्रमाणात घटली आहे. या महिन्यात डेंग्यूचे ५८ संशयित रुग्ण आढळले असून, चिकुनगुन्याचा एकही रुग्ण आढळलेला नाही. महापालिकेच्या आरोग्य विभागाने दिलेल्या माहितीनुसार, शहरात डेंग्यूचे या वर्षभरात ४ हजार ४२२ रुग्ण आढळले आहेत. त्यापैकी ३५७ रुग्ण निदान झालेले आहेत. यंदा जुलैपासून डेंग्यूच्या रुग्णसंख्येत वाढ सुरू झाली. जुलैमध्ये डेंग्यूचे संशयित रुग्ण ६३६, ऑगस्ट १ हजार १५०, सप्टेंबर १ हजार २९१, ऑक्टोबर ८०० आणि आता नोव्हेंबरमध्ये ही रुग्णसंख्या ५८ वर आली आहे. पावसाळा सुरू झाल्यानंतर डेंग्यूच्या रुग्णसंख्येत वाढ सुरू झाली होती. त्यात नंतर वाढ होत गेली होती. पावसाळा संपल्यानंतर ही रुग्णसंख्या कमी झाली आहे. शहरात चिकुनगुन्याचे रुग्ण जुलैपासून वाढले. शहरात यंदा चिकुनगुन्याचे एकूण ४४८ रुग्ण आढळले आहेत. त्यात जुलै २४, ऑगस्ट ५२, सप्टेंबर २२५, ऑक्टोबर १३७ अशी रुग्णसंख्या आहे. या महिन्यात चिकुनगुन्याचा एकही रुग्ण आढळून आलेला नाही.

## साकूरमध्ये भरदिवसा दरोडेखोरांचा थरार...

### बंदूकीचा धाक दाखवून सोन्याचे दुकान लुटले...



**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.११, संगमनेर (अहिल्यानगर) :** तालुक्यातील संगमनेर नंतर सर्वात मोठी बाजारपेठ असणार्या साकूर येथे आज सोमवारी भर दुपारी दिड वाजता दरोडेखोरांचा थरार समोर आला. दुचाकीवरून आलेल्या पाच दरोडेखोरांनी बंदूकीचा धाक दाखवत बसस्थानकाजवळील कान्हा ज्वेलर्स दूकान लूटून नले. या लुटीनंतर सदर चोरट्यांनी भर गर्दीमध्ये हवेत गोळीबार करत घटनास्थळावूनर धुमस्टाईलने पळ काढला. ही घटना समजल्यानंतर उपविभागीय पोलीस अधिकारी कुणाल सोनवणे, घारगाव पोलिस निरीक्षक दिगंबर भदाणे यांच्या पथकाने पारनेरच्या दिशेने पळालेल्या चोरट्यांना पाठलाग सुरू केला आहे. दरम्यान या रस्त्यातील मांडवे फाटा, खडकवाडी याठिकाणी नागरीकांनी या चोरट्यांना पकडण्याचा प्रयत्न केला असता. चोरट्यांनी हवेत गोळीबार करत धुम ठोकली. भरदिवसा गजबजलेल्या ठिकाणी ही घटना घडल्याने साकूरमध्ये एकच खळबळ उडाली असून पोलीसांच्या कायदा सुव्यवस्थेवर प्रश्न चिन्ह निर्माण झाला आहे.

**दुकानात चोरी करतांनाचा सीसिटीव्ही कॅमे-यात कैद**

सविस्तर माहिती अशी की, साकूर बसस्थानकजवळ निखील सुभाष लोळगे यांचं कान्हा ज्वेलर्सचे दूकान आहे. दुपारी दिड वाजेच्या सुमारास पल्सर गाडीवर पाच दरोडेखोरांनी येऊन दुकानात प्रवेश केला. निखिल लोळगे व तेथे असलेल्या एका ग्राहकाला बंदूकीचा धाक दाखवत बाजूला केले. त्यांनी कान्हा ज्वेलर्स दुकानातील संपूर्ण सोन्याचा माल बँगेत भरून लूटून नेला. पाचही दरोडेखोरांनी तोंडाला कापड बांधलेले होते. दरोडेखोरांनी गंठण, चैनी, मंगळसूत्र, वाट्या, कान चैनी, मिनी गंठण, टॉप्स, बाळ्या आदि सोन्याचं माल घेऊन फरार झाले. या घटनेनंतर नागरिकांनी मोठ्या प्रमाणात घटनास्थळी गर्दी केली मात्र या दरोडेखोरांकडे बंदूक असल्याने त्यांची गाडी अडवण्याचा कोणी प्रयत्न करत असेल तर त्यांना बंदूकीचा धाक दाखवून प्रसंगी हवेत गोळीबार करत ते पसार झाले आहे. याचा हा संपूर्ण प्रताप सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद झाला असून लवकरच या दरोडेखोरांच्या मुसक्या आवळल्या जातील असे पोलिस उपाधिक्षक कुणाला सोनवणे यांनी म्हटले आहे.

## मेहकरात वाटपासाठी ४० खोके आलेत, प्रकाश आंबेडकर यांचा आरोप

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.११, बुलडाणा :** शिवसेनेतील बंडाळीनंतर पन्नास खोके सारेच ओकेचा नारा गुंजला. यानंतर त्याचे पडसाद विधानसभा परिसर ते वेळोवेळी होणाऱ्या शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे गट)च्या जाहीर सभा, सन २०२४ मध्ये पार पडलेल्या लोकसभा निवडणूक प्रचार सभा, एवढेच काय कोणत्याही कार्यक्रमात हा नार गुंजत राहिला, आरोप होतच राहिले. सध्या विधानसभा निवडणुकीच्या प्रचारातही पन्नास खोके गाजताहेत. नेते सांगायचे विसरले तरी ठाकरे गटाचे शिवसैनिक हा नारा देत नेत्याला त्याची आठवण करून देतात.

सोमवारी, ११ नोव्हेंबर रोजी हे सर्व आठवायचे कारण की, राज्यातील एका नेत्याने प्रचार सभेत पुन्हा खोक्यांची आठवण करून दिली आहे. आरोप खोक्यांचाच आहे, आकडा दहा खोक्यानी कमी आहे आणि वाटप नेत्यांऐवजी मतदारांत होणार असल्याचे सांगण्यात आले आहे. एवढाच काय तो फरक आहे. हा आरोप करणारा नेता मात्र शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाचा नाही! मात्र हा नेता राजकीय भूमिकेमुळे टीकेचा धनी ठरलेले वंचित बहुजन आघाडीचे राष्ट्रीय अध्यक्ष प्रकाश उपाख्य बाळासाहेब आंबेडकर आहे.त्यांनी हा खोक्यांचा बॉम्ब टाकलाय! बुलढाणा जिल्ह्यातील अनुसूचित जाती करिता राखीव मेहकर विधानसभा मतदारसंघात वंचित आघाडीतर्फे ऋतुजा चव्हाण रिंगणात आहे.

**काय बोलले बाळासाहेब ?**

ऋतुजा चव्हाण यांच्या प्रचारासाठी प्रकाश आंबेडकर यांनी सोमवारी मेहकर मध्ये उर्दू शाळा क्रमांक तीन परीसरातील स्वतंत्र मैदानात जाहीर सभा घेतली. यावेळी त्यांनी मेहकर मतदारसंघात वाटण्यासाठी चाळीस खोके आल्याचा खळबळजनक आरोप केला. यावेळी त्यांनी पक्षाचा थेट उल्लेख केला नसला तरी त्याचा रोख युतीकडे होता. यावेळी आंबेडकर म्हणाले की, मेहकर मतदारसंघात एक एक मत दहा हजार रुपयाला विकले जाण्याची शक्यता आहे. कारण मला माहिती मिळाली की , कुठे कुठे चाळीस कोटी रुपये आलेत.मेहकरात देखील चाळीस कोटी रुपये आले आहे.ते कुठे कुठे आहेत याची मला संपूर्ण माहिती मला आहे. यावेळी बंदोबस्तासाठी उपस्थित पोलीस अधिकारी, कर्मचारी यांना सल्लावजा आवाहन देखील त्यांनी केले. ते म्हणाले की, पोलिसांनो धाडी टाकाल का? मी यादी देतो.

माझे म्हणणे आहे की, धाडी टाकू नका हा पैसा वाटून खा ! खिशात घालून मोकळे व्हा!असे थेट आवाहन ॲड. बाळासाहेब आंबेडकर यांनी केले. त्यांनी कितीही पैसे वाटले तरी खुशाल वाटू द्या, पण मतदान मात्र वंचित बहुजन आघाडीच्या उमेदवार ऋतुजा चव्हान यांनाच करा.उद्याच्या पिढीचे अधिकार कायम ठेवायचे असेल तर वंचितला मत द्या असे ही ते आंबेडकर यांनी केलेल्या या आरोपाने मेहकर मतदारसंघात खळबळ उडाली आहे.मात्र याचे पडसाद संपूर्ण राज्यात, विधानसभा निवडणुकीच्या विविध विरोधी पक्ष नेत्यांच्या प्रचार सभांमध्ये उमटणार हे निश्चित. यामुळे सत्ताधारी अडचणीत येण्याची चिन्हे आहेत. याची दखल निवडणूक आयोग घेण्याची शक्यता नाकारता येत आहे.




## पक्षीतज्ज्ञ डॉ.सलीम अली

आंतरराष्ट्रीय ख्यातीचे पक्षीतज्ञ डॉ सलीम अली यांचा आज जन्मदिन आहे. पक्षीतज्ज्ञ डॉ सलीम अली यांचा जन्म आजच्याच दिवशी म्हणजे १२ नोव्हेंबर १८९६ रोजी मुंबईत एका गरीब मुस्लिम कुटुंबात झाला. त्यांचे पूर्ण नाव सलीम मोईनुद्दीन अब्दुल अली असे होते. सलीम अली हे एक वर्षाचे असतानाच त्यांच्या वडिलांचे तर दोन वर्षाचे असताना आईचे निधन झाले. अगदी बालवयातच आई वडिलांचे छत्र हरपलेल्या सलीम अलींचा सांभाळ त्यांच्या मामांनी केला. सलीम अली यांना लहानपणापासून पक्षी निरीक्षणाची आवड होती. वयाच्या नवव्या वर्षी त्यांनी गळ्यावर पिवळा डाग असलेली चिमणी विकत घेतली होती. हा पक्षी कोणता आहे ? त्याचे नाव काय आहे ? हे त्यांना माहीत नव्हते म्हणून ते माहीत करून घेण्यासाठी ते त्या चिमणीला घेऊन माम ांकडे गेले मामांनी सरळ त्याला बॉम्बे नॅचरल हिस्ट्री सोसायटीच्या संचालकाकडे घेऊन गेले. तिथे संचालकांनी सलीम अलींना त्या पक्षाची सविस्तर माहिती सांगितली तसेच संस्थेतील भुसा भरलेल्या पक्षांचा संग्रह दाखवला. तो क्षण डॉ सलीम अलींच्या आयुष्याला कलाटणी देणारा ठरला. त्या क्षणी त्यांच्यावर पक्षांची जी भुरळ पडली ती कायमचीच. त्यानंतर त्यांना पक्षी निरीक्षणाचा छंदच जडला. १९१३ साली मॅट्रिक परीक्षा उत्तीर्ण झाल्यावर डॉ सलीम अली यांनी सेंट झेव्हीयर महाविद्यालयात उच्च शिक्षणासाठी प्रवेश घेतला. लहानपणापासून पक्षी निरीक्षणाची आवड असल्याने सलीम अली यांनी उच्च शिक्षणासाठी प्राणी विज्ञान हा विषय निवडला. या विषयात त्यांना बी ए ऑनर्स ही पदवी मिळवली मात्र ही पदवी विद्यापीठाच्या समकक्ष समजली जात नव्हती त्यामुळे त्यांना भारतीय प्राणी वैज्ञानिक सर्व्हेक्षण संस्थेत नोकरी मिळू शकली नाही मात्र बॉम्बे नॅचरल हिस्ट्री सोसायटीत त्यांना व्याख्यता म्हणून नोकरी मिळाली. त्यानंतर ते जर्मनीची राजधानी बर्लिनला गेले तेथे जाऊन त्यांनी पक्षी शास्त्रावर प्रशिक्षण घेतले तिथे त्यांना जगप्रसिद्ध पक्षीतज्ज्ञ एर्व्हिन ष्ट्रेझमन यांचे म ार्गदर्शन लाभले. त्यानंतर काही काळ इंग्लंडम ध्येही काम केले. १९३१ साली ते भारतात परत आले. परत आल्यावर त्यांनी बॉम्बे नॅचरल हिस्ट्री सोसायटीचे उपकार्यवाहक पद स्वीकारले. नंतर ते या संस्थेचे अध्यक्षही बनले. बॉम्बे नॅचरल हिस्ट्री सोसायटीच्या माध्यमातून त्यांनी हैदराबाद पक्षी निरीक्षण, त्रावणकोर - कोचीन पक्षी सर्व्हेक्षण, अफगाणिस्तान पक्षी सर्व्हेक्षण, कैलास पक्षी निरीक्षण यात्रा अशा मोहिमा राबवल्या. डॉ सलीम अली यांनी सुगरण पक्षाच्या वर्तनावर बारकाईने अभ्यास केला व त्यावर बिएनएचएस जर्नलमध्ये एक शोधनिबंध लिहिला. या शोध निबंधाने त्यांना पक्षी शास्त्रज्ञ म्हणून मान्यता मिळवून दिली. डॉ सलीम अली यांनी भारतभर फिरून विविध पक्षांची तपशीलवार माहिती गोळा केली. ती माहिती त्यांनी सर्वसामान्य नागरिकांना समजावी यासाठी पुस्तक रुपात लिहिली. त्यांनी लिहिलेल्या हँडबुक ऑफ इंडिया अँड पाकिस्तान व पिक्टोरियल गाईड या दहा खंडीय पुस्तकाने त्यांचे जगभर नाव झाले. डॉ डीलन रीलपे यांच्या साथीत त्यांनी अपार मेहनत घेऊन भारतीय पक्षांच्या बाराशे जाती, २१०० उपजातींच्या नोंदी, सवयी, शास्त्रशुद्ध सर्वांगीण माहिती चित्रांसाहित एकाच ठिकाणी उपलब्ध करून दिली. डॉ सलीम अली यांच्या ह्याच कार्याने भारतात हौशी पक्षी निरीक्षक बनण्याची परंपरा निर्माण झाली. भारतातील पक्षी निरीक्षक डॉ सलीम अली यंन्स आद्य गुरू मानतात. त्यांच्या कार्याची नोंद घेऊन भारत सरकारने त्यांना पद्मभूषण पुरस्कार देऊन त्यांचा गौरव केला तसेच त्यांचा जन्मदिन पक्षीदिन म्हणून साजरा करण्याची घोषणा केली. डॉ सलीम अली यांचे २७ जुलै १९८७ रोजी निधन झाले.

**डॉ.सलीम अली यांना जन्मदिनी विनम्र अभिवादन!**

# 'कानडा राजा पंढरीचा !'

महाराष्ट्रात धर्माला फार महत्त्व दिले जाते. धर्मतेज जागवणारा पंढरीचा विठोबा हा महाराष्ट्र, आंध्र आणि कर्नाटक राज्यांच्या सीमेवर आहे. काही जण म्हणतात, 'हा धनगरांचा देव आहे. हा मूळ 'आदिम' (आदिवासी), अ-नागर देवच पुढे धनगरांसह 'पंडरिगे' या गावी आला आणि पुढे तो 'पांडुरंग' झाला.' पंडरिगे या गावाची 'पंढरी' झाली. पूर्वी तेथे धनगरांच्या वस्त्या होत्या; परंतु नंतर नागरवस्तीमुळे पुढे या पंढरीला 'पंढरपूर' या नावाने संबोधण्यात येऊ लागले. अशा रितीने पंढरीचे पंढरपूर झाले.

पुंडलिकाच्या वेळी पंढरपूरला स्थापन झालेली पांडुरंगाची ही मूर्ती पुढे कर्नाटकातील विजयनगरच्या राजाने त्याच्या साम्राज्यात नेली. त्याने त्या मूर्तीची तुंगभद्रेच्या तिरावर स्थापना केली. त्या काळी महाराष्ट्रातील पैठण येथील संत भानुदास (संत एकनाथ महाराज यांचे आजोबा) हे विठ्ठलाचे मोठे भक्त होते. त्यांचा आध्यात्मिक अधिकार मोठा होता. एकदा विठ्ठलाने प्रसन्न होऊन त्यांना दृष्टांत दिला आणि 'मी कर्नाटकात आहे. तू मला पंढरपुरात नेऊन माझी स्थापना कर', असे त्यांना सांगितले. विठ्ठलाने सांगितल्याप्रमाणे संत भानुदास यांनी विजयनगरच्या राजाकडे जाऊन विठ्ठलाच्या मूर्तीची मागणी केली. राजालाही दृष्टांत झाला होता. त्यामुळे संत भानुदासांचे विठ्ठल प्रेम आणि भक्ती पाहून राजाने ती मूर्ती त्यांना दिली. संत भानुदासांनी ती मूर्ती पंढरपूरला आणून तिची प्रतिष्ठापना केली.

पांडुरंग हा शैव आणि वैष्णव दोघांचाही देव आहे. याला शैव आणि वैष्णव दोघेही भजतात. शैव पंथीय पांडुरंगाला 'वीरभद्र' म्हणजेच 'विठ्ठल' म्हणतात, तर वैष्णव त्याला 'गोपाळकृष्ण' असे म्हणतात. तो विष्णु आणि शिव यांचा अवतार आहे; म्हणूनच तो 'हरिहर' आहे. असा हा पांडुरंग श्रीकृष्णाचाच अवतार आहे. काही जण 'विठ्ठल हा भगवंताचा नववा अवतार बुद्ध आहे', असेही म्हणतात. (आद्यशंकराचार्यांच्या काळात भारतात काही नवीन धार्मिक प्रवृत्तींचा उदय होऊन जैन, बौद्ध इत्यादी धर्मपंथ उदयास आले होते. महाराष्ट्रातही बौद्ध धर्माचा प्रभाव असल्याचे दिसून येते; कारण कोकण किनारपट्टी, घाटमाथा, मराठवाडा येथील सह्याद्री पर्वताच्या रांगांमध्ये बुद्धाच्या कलाकृती असलेल्या गुंफा दिसतात.) जैन विठ्ठलाला 'तो बाविसावा तीर्थंकर नेमीनाथ आहे', असे म ानतात. नेमीनाथ आणि कृष्ण हे दोघेही गोपाळच होते. ते यदुकुलोत्पन्नच होते. नेमीनाथ हाही विठ्ठलासारखा वर्णाने सावळा होता. नेमीनाथांचे शंख हे चिन्ह विठ्ठलानेही धारण केले आहे. त्यामुळे या सर्व लक्षणांवरून 'विठ्ठल हा दिगंबर नेमीनाथ असावा', असे जैनांचे मत आहे.



दक्षिणेला हाच गोपाल 'श्रीव्यंकटेश ऊर्फ तिरुपती बालाजी' म्हणून प्रसिद्ध आहे; कारण व्यंकटेशाची पत्नी पद्मावती आहे, तर विठ्ठलाच्या पत्नीचेही नाव पद्मावती (पदुबाई) आहे. व्यंकटेशाची पत्नी पद्मावती त्याच्यावर रूसून तिरूयानूर येथे चिंचेच्या वनात रहायला गेली, तर विठ्ठलाची पत्नी रुक्मिणी ही दिंडीर वनात (चिंचेच्या वनात) जाऊन बसली होती. 'विठ्ठलाला 'पांडुरंग' म्हणतात', तसेच व्यंकटेशालाही कर्नाटकातील पर्वताच्या स्थलनामावरून 'वेंगडम' असे म्हणतात. त्यामुळेच त्याला 'विठ्ठलेश्वर अथवा व्यंकटेश' असेही म्हणतात. कुरूबा ('कुरूबा' सम ाज हा धनगर पोटजातीपैकी एक आहे.) आणि धनगर यांचा देव एकरूप होऊन त्यातून 'विठोबा' निर्माण झाला. शिला प्रतिमेतून ही जी सांगोपांग मूर्ती घडली, ती मात्र या दोन्ही जमातींनी शतकानुशतके त्याच रूपात जपून ठेवली असली पाहिजे; म्हणूनच विठ्ठल आणि तिरुपति या दोन्ही मूर्तींत पुष्कळ साम्य आढळते. पंढरीचा विठोबा दोन्ही हात कटीवर ठेवून उभा आहे, तर कर्नाटकात तो एक हात कटीवर आणि दुसरा हात वरद मुद्रेत असलेला अशा स्वरूपात अनेक ठिकाणी पहायला मि ळतो. त्यामुळेच संतांनी 'सावळा हो विठ्ठलु कर्नाटकु', असे त्याचे वर्णन केले आहे. संतांनी त्याला 'कानडा' म्हणूनही हाक मारली आहे. चैतन्याची ज्या अनुसंधानातून आराधना केली जाते, त्या स्वरूपात ते प्रगट होते. ज्याचा जसा भक्तीभाव असेल, तशी त्याला देव अनुभूती देतो. बंगालमधील कोलकाता येथील कोळ्यांच्या राणीने दक्षिणेश्वरीदेवीची स्थापना केली होती. त्या देवळात तिने श्रीरामकृष्ण परमहंस यांची पुजारी म्हणून नियुक्ती केली होती. श्रीरामकृष्ण परमहंस यांच्या भक्ती-भावामुळे देवी त्यांच्यावर प्रसन्न झाली आणि तिने त्यांना दर्शन दिले. अनेकांना वाटते, 'दगडात देव असतो का?'; परंतु 'भक्ती-भावाने दगडालाही पाझर फुटतो', हे ध्यानात घ्यायला हवे.

पांडुरंग हे सामान्यांचे दैवत आहे. पांडुरंगाचा रंग सावळा आहे आणि कृष्णही सावळाच आहे. काळा रंग हा अद्वैताचा आहे. वृंदावनातील गोपी कृष्णाला म्हणत, ''अरे कृष्णा, तू अमावास्येला अंगावर काळी घोंगडी घेऊन यमुनाकाठी कदंब वृक्षावर बसलास की, तू आम्हाला दिसतच नाहीस; कारण रात्र काळी, यमुना काळी, तू काळा आणि घोंगडीही काळीच ! अशा वेळी हे सर्व अद्वैत होऊन जाते.'' संत ज्ञानदेव म्हणतात, 'तुज सगुण म्हणों कीं निर्गुण रे । सगुण निर्गुण एकु गोविंदु रे ।' म्हणजेच तो सगुण आहे आणि निर्गुणही आहे. त्याचे सगुण स्वरूप हे निर्गुणच आहे. तो स्वच्छ म्हणजे निर्मळ आहे. त्याची इंद्रिये विकाररहित आणि स्वच्छ आहेत. तो आत-बाहेर स्वच्छ आहे; म्हणून तो 'पांडुरंग' आहे. एकदा लहानपणी संत ज्ञानेश्वर आणि मुक्ताबाई खेळत असतांना मुक्ताबाई ज्ञानदेवांना म्हणाली, ''अरे दादा, तू या पांडुरंगाला निर्गुण म्हणतोस; परंतु हा तर सगुण स्वरूपात येथे कटीवर हात ठेवून उभा आहे.'' त्यावर संत ज्ञानेश्वर महाराज म्हणतात, ''मुक्ता, मी तुला गुरुम ुखातून सांगतो. अगं, हा निर्गुणी बुंद (बिंदु) सगुणी उतरला आहे.'' एकूणच हा निर्गुणच सगुण स्वरूपात इथे दिसत आहे. तो कष्टकरी, शेतकरी, सामान्यजन आणि अनाथ यांचा कैवारी आहे; म्हणून तो (उन्हात कष्ट करून रापलेला असा) काळ्या रंगाचा झाला आहे. असा हा सगुण-निर्गुण रूपी पांडुरंग आहे.

कोणत्या तरी विशिष्ट वारीला, तिथीला अथवा कोणत्या तरी मासात विशिष्ट देवतांची स्पंदने पृथ्वीवर अधिक प्रमाणात कार्यरत असतात. तो काळ त्या देवतेचा काळ मानला जातो, उदा. शिवाचा सोमवार, दत्ताचा गुरुवार, तशी श्रीविष्णूची एकादशी. वर्षभरात २४ वेळा येणार्या एकादशींच्या तुलनेत आषाढ आणि कार्तिक मासांतील शुक्लपक्षात येणार्या एकादशींच्या वेळी श्रीविष्णूचे तत्त्व पृथ्वीवर अधिक प्रमाणात येत असल्याने श्रीविष्णूशी संबंधित या दोन एकादशींचे महत्त्व अधिक आहे.

**(संदर्भ : सनातन डॉट ऑर्ग)**
**जगन घाणेकर, घाटकोपर, मुंबई**
**संपर्क : ९६६४५५९७८०**

# चिमुकल्यांची पथनाट्याद्वारे जवळ्यात मतदानजागृती...

**दि.११, नांदेड :** २० नोव्हेंबर रोजी होणाऱ्या लोकसभा पोटनिवडणुक व विधानसभा निवडणुकीत मोठ्या प्रमाणावर मतदान होण्यासाठी विविध उपक्रम राबविले जात आहेत. विविध शाळा म हाविद्यालयांतून तसेच स्विपद्वारे मतदानाची टक्केवारी वाढविण्यासाठी प्रयत्न केले जात आहेत. या कामी जवळा दे. येथील काही विद्यार्थ्यांनी पुढाकार घेऊन पथनाट्याचे उत्तम सादरीकरण केले. घरातच बसता का गं तुम्ही, मतदान करु या साऱ्या जणी... बाई बाहेर ये गे मत देऊन ये अशा प्रकारे गीतांच्या माध्यमातून पथनाट्याद्वारे जवळ्यात मतदानजागृती करण्यात आले. चिमुकल्यानी पथनाट्याद्वारे गावकऱ्यांचे लक्ष वेधले. लेखक गंगाधर ढवळे यांनी लिहिलेल्या पटकथेवरुन जिल्हा परिषद प्राथमिक शाळा जवळा दे. येथील विद्यार्थ्यांनी पथनाट्य सादर केले. यावेळी मुख्याध्यापक गंगाधर ढवळे, विषय शिक्षक उमाकांत बेंबडे, मतदान केंद्रस्तरीय अधिकारी संतोष घटकार, हैदर शेख यांच्यासह गावकऱ्यांची उपस्थिती होती.



नांदेड दक्षिण मतदारसंघातील जवळा देशमुख ता मतदान केंद्रांतर्गत मतदान जनजागृतीसाठी शाळेतील शिक्षक, केंद्रप्रमुख तसेच विद्यार्थ्यांनी मतदान जनजागृतीसाठी पुढाकार घेतला आहे. या पथनाट्याद्वारे मुलींनी गावातील सर्व महिलांना तसेच पुरुष मतदारांचे लक्ष वेधून मतदान करण्याबाबत आवाहन केले.

दीपावली सुट्टी असतांनाही शाळेचे मुख्याध्यापक गंगाधर ढवळे, विषय शिक्षक उमाकांत बेंबडे, मतदान केंद्रस्तरीय अधिकारी तथा सहशिक्षक संतोष घटकार तसेच केंद्रप्रमुख संतोष अंबुलगेकर यांच्या मार्गदर्शनाखाली काही विद्यार्थ्यांनीनी पुढाकार घेत गावातील ठीक ठिकाणी पथनाट्य सादर केले. या पथनाट्यात मी मतदान करणारच! अशा टोप्या घातलेल्या ज्ञानवी पांचाळ, अपेक्षा गोडबोले, मोनिका गोडबोले, ज्ञानेश्वरी शिखरे, शिवानी शिखरे, आकांक्षा गोडबोले, आर्या गच्चे, श्रुती गच्चे आदी विद्यार्थ्यांनीनी मतदान जनजागृतीत सहभाग घेतला होता.

## भुरळ...

शब्दांचेसम्राट चांगले
पाडती सहज भुरळ
दावणीला बांधू जाई
सामान्यफसले सरळ

चमत्कारीक मृगजळ
असे टाकतात जाळं
हरेक शब्द वाटे खरे
गुंतून टाकते जंजाळ

फणा रे लोभसवाणा
नकळत ओतते गरळ
काट्याने वेढले जाते
नाजूक निर्मळ अरळ

बाताडे बोलती उधळ
हातात दिधला नारळ
कृतीत आणती उक्ती
शक्यता अति विरळ

फसतात भले चांगले
रे देखणेपणालातरळ
कसे पोचावे सु स्थळ
रस्ता बनविला दूरळ

रेआयत्या पिठावरती
निवांत फिरती झुरळ
बदलला भलास्वभाव
वाकड्यात शिरेसरळ

**- हेमंत मुसरीफ, पुणे**
**९७३०३०६९९६**

अक्षराज
अचूक वेध, अचूक बातमी

# गुरु राज माऊलीच्या गजरात दुमदुमली पानगाव नगरी...

**अक्षराज : उमेश जोशी**

**दि.११, पानगाव (रेणापूर) :** गुरु राज म ाऊली मनमन्थ माऊली च्या गर्जनाचे व वसुंधरा डॉ शिवलिंग शिवाचार्य अमदपूरकर यांच्या प्रेरणेने गेल्या ७०वर्षा पासून सूरू असेलेली अमदपूर ते मन्मथ स्वामी कपिलाधार पदयात्राचे काल रविवार दि १०रोजी संध्याकाळी ७ वाजता पानगाव नगरी मध्ये आगमन झाले. आगमन होताच पानगाव येथील वीरशैव महात्मा बसवेश्वर संस्थान च्या वतीने मोठया उत्साहामध्ये या पदयात्रे चे स्वागत करण्यात आले.या पदयात्रेचे पानगावात रविवारी आगमन होताच गुरुराज माऊली च्या नामस्मरणाने पानगाव नगरी दुमदुमन होती

या पदयात्रे मध्ये महाराष्ट्रतील नव्हे तर कर्नाटक,आंध्रप्रदेश, तेलंगणा या पर राज्यातील हजारो शिववैश भक्तगण गुरु राज माऊलीच्या टाळ मृदंगाच्या साथीमध्ये हाती भगवा पताका ध्वज घेऊन सहभागी होतात.



या वेळी समस्थ गावकरी व महात्मा बसवेश्वर स्वंस्थान च्या वतीने दिंडीचे भव्य स्वागत करण्यात आले दारोदारी सडा- रांगोळी काढून व दिंडी प्रमुखकांची पुजा व ओळाणी करून या दिंडी चे स्वागत करण्यात आले. या वेळी अतिषबाजी करून पानगावकरानी दुसरी दिवाळीच या वेळी साजरी केली. असा देखावा या वेळी पाहावयास मिळाला.

गुरुराज माऊली च्या गजरात हि दिंडी महात्मा बसवेश्वर मंदिरा पर्यत गेली. तेथे संस्थानच्या वतीने पदयात्रेतील सहभागी महाराजांचा यथोचित सत्कार व दर्शन घेण्यात आले तसेच डॉ शिवलिंग शिवाचार्य महाराज यांच्या पादुकाणचे दर्शन घेण्यात आले महात्मा बसवेश्वर संस्थानच्या वतीने प्र.ब उत्तर अधिकारी प्र.ब १०८ राज शेखर शिवलिंग शिवाचार्य माहाराज आणि आचार्य गुरु - राज स्वांमी यांचा यतोचित सन्मान कारण्यात आला. काही मुस्लिम बांधवानी सुद्धा महाराजाचा सत्कार करून दर्शन या वेळी घेतले. या नंतर महाराज चे आशिर्वचन झाले व त्यानंतर महाप्रसादाचा लाभ सर्व भक्त गाणंनी लाभ घेतला रविवारी संध्याकाळी गुरुराज माऊली च्या गजराने पानगाव नगरी दुम दुमन गेल्याचे पाहयला मिळाले.

# डॉ. प्रियांका खोले यांना 'कृषी यांत्रिकीकरण संशोधक' पुरस्कार जाहीर

**अक्षराज : साहेबराव गागलवाड**

**दि.११, नांदेड :** संस्कृति संवर्धन मंडळ कृषि विज्ञान केंद्र सगरोळी येथील शास्त्रज्ञ डॉ. प्रियंका राजकुमार खोले यांना भारतातील अग्रगण्य कृषीथॉन प्रदर्शनात 'प्रयोगशील युवा कृषी संशोधक (प्रयोगशील कृषी यांत्रिकीकरण संशोधक)' पुरस्काराने गौरवण्यात येणार आहे.

कृषी क्षेत्रात युवा शक्ती: भारतातील अग्रगण्य कृषीथॉन या प्रदर्शनाच्या व्यासपीठावरून विविध श्रेणीत कार्य करणाऱ्या कर्तबगारांचा सन्मान करण्यात येणार असून, यामध्ये प्रयोगशील युवा कृषी संशोधक, उद्योजक, विस्तार कार्यकर्ते आणि शेतकरी यांचा समावेश आहे. आयोजक संजय न्याहारकर यांनी या माहितीची घोषणा केली.

ह्युमन सर्व्हिस फाउंडेशन व मीडीया एक्झिबिटर्स प्रा. लि. यांच्या संयुक्त विद्यमाने 'कृषीथॉन' युवा कृषी सन्मान पुरस्कार या आंतरराष्ट्रीय पातळीवरील प्रदर्शनाचे १७ वे आवर्तन २२ नोव्हेंबर २०२४ रोजी नाशिक येथे आयोजित भव्यदिव्य कार्यक्रमात सदरील पुरस्काराने गौरविण्यात येत आहे.

शेतकरी कल्याणासाठी नवीन तंत्रज्ञान: डॉ. खोले यांनी कृषि अभियांत्रिकीमध्ये कृषि मशीनरी आणि ऊर्जा या विषयावर विशेष लक्ष केंद्रित करून संशोधन आणि विकास या विभागात अभूतपूर्व काम केले आहे. त्यांनी लसून काढणी तंत्रद्यान, साधारित सूर्यफूल बी काढणे, शेणउचलून गोळा करणारे तंत्रद्यान, भूईमुग काढणी तंत्रद्यान असे अनेक प्रयोग, संशोधन आणि मूल्यवर्धन केले आहे. त्यांनी शेती यांत्रिकीकरण संशोधनात महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे आणि शेतकऱ्यांना नवीन तंत्रज्ञान पोहोचवण्याचे काम करत आहेत. या जाहीर पुरस्कारामुळे विविध स्तरांतुन अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

# थोडक्यात

## पालशेत जि.प.गटात घरोघरी मनसेचे प्रमोद गांधी यांचा प्रचार



**अक्षराज : उदय दणदणे**

**दि.११, गुहागर :** विधानसभा क्षेत्र २६४ गुहागर मतदार संघातील महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अधिकृत उमेदवार प्रमोद गांधी यांचा गुहागर तालुक्यातील पालशेत जि.प.गटात कोंडकारूळ ठिकाणी घरोघरी जाऊन प्रचार करताना मनसे सैनिक.

## ठाणे जिल्ह्यात दि.११ नोव्हेंबर पर्यंत २३ कोटी ४१ लाख ६ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त

**दि.११, ठाणे :** विधानसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ च्या पार्श्वभूमीवर संपूर्ण राज्यात व ठाणे जिल्ह्यात भारत निवडणूक आयोगामार्फत आचारसंहिता लागू करण्यात आली आहे. या आचारसंहिता काळात नियमांचे पालन न करणाऱ्यांविरोधात प्रशासनामार्फत कठोर कारवाई करण्यात येते. या अंतर्गत ठाणे जिल्ह्यातील १८ विधानसभा मतदारसंघांमधून दि.११ नोव्हेंबर २०२४ पर्यंत एकूण २३ कोटी ४१ लाख ६ हजार रुपयांचा मुद्देमाल प्रशासनाकडून जप्त करण्यात आला आहे.

यामध्ये १२ कोटी ४१ लाख १६ हजार रोख रक्कम, २ कोटी २२ लाख १४ हजार रुपये किंमतीचा मद्यसाठा, १ कोटी ६४ लाख ७० हजार रुपये किंमतीचे अंमली पदार्थ, २३ लाख २६ हजार रुपये किंमतीच्या मौल्यवान वस्तू / दागिने आणि ६ कोटी ८९ लाख ७९ हजार रुपये किंमतीचे मोफत वाटपाचे साहित्य ठाणे जिल्ह्यातील १८ विधानसभा मतदारसंघांमधून प्रशासनाकडून जप्त करण्यात आले आहे.

## हदगाव विधानसभा मतदार संघात दोन दिवस गृह मतदान

**अक्षराज : चंद्रकांत भोरे**

**दि.११, हदगांव (नांदेड) :** हदगाव-हिमायतनगर विधानसभा मतदारसंघासाठी ८५ वर्षा पेक्षा अधिक वय असलेले १९८ तसेच १८ दिव्यांगांनी फॉम नं.१२ डी भरुन दिल्याने असे एकूण २१६ मतदार दि.१४ व १५ नोव्हेंबर २०२४ ला गृह मतदान करणार आहेत.या टपाली मतदान प्रक्रियेसाठी ८ पथके नियुक्त करण्यात आली आहेत. २१६ मतदाराच्या गृहभेटी घेवून दोन दिवसात मतदान प्रक्रिया पुर्ण करावी अशा सुचना निवडणूक निर्णय अधिकारी अविनाश कांबळे यांनी दिल्या असल्याचे सहायक निवडणूक निर्णय अधिकारी श्रीमती पल्लवी टेमकर, टपाली मतपत्रिका कक्ष प्रमुख जी.डी.हराळे एम. झेड सिद्दीकी,सुनिल राठोड यांनी कळविले आहे.

## मुंबईत थंडीची चाहुल...

**दि.११, मुंबई :** गेले अनेक दिवस मुंबई शहर, तसेच उपनगरांत उकाड्याचा प्रभाव होता. गरम हवा, आर्द्रतेमुळे होणाऱ्या काहिलीमुळे नागरिक त्रस्त होते. मात्र, मागील तीन – चार दिवसांपासून मुंबईतील किमान तापमानात अधूनमधून घट झाली असून पहाटे गारवा जाणवू लागला आहे. मुंबईशिवाय कल्याण, ठाणे या पट्ट्यातही दोन दिवसांपासून तापमानाचा पारा खाली आला आहे. हवामान विभागाच्या कुलाबा केंद्रात सोमवारी २५ अंश सेल्सिअस, तर सांताक्रूझ केंद्रात २२.२ अंश सेल्सिअस किमान तापमानाची नोंद झाली. मुंबईमधून मोसमी पावसाच्या परतीचा प्रवास पूर्ण झाल्यानंतर नागरिकांना सतत उकाडा सहन करावा लागत होता. तसेच कमाल तापमानातही सरासरीपेक्षा वाढ झाली होती. दरम्यान, उत्तरेकडून येणाऱ्या थंड वाऱ्यांमुळे मुंबईत थंडीची चाहुल लागली आहे. तसेच मागील दोन ते तीन दिवसांपासून कमाल तापमानाचा पारा खाली आल्याने दिवसभराचा उकाडा काहीसा कमी झाला आहे.

## वाई विधानसभेत महायुतीचा पदाधिकारी कार्यकर्ता मेळावा संपन्न

**अक्षराज : रियाज मुजावर**

**दि.११, महाबळेश्वर :** वाईचे आमदार पाटील यांना मी कित्येक वर्षांपासून ओळखतो मकरंद आबाच्या सारखा जातीय सलोखा राखणारा, सर्वांसाठी झटणारा, जनतेच्या कायम संपर्कात राहणार नेता वाई खंडाळा महाबळेश्वर मतदार संघाला लाभला आहे. मकरंद आबाच्या वर कणभर उपकार केले तर ते त्याची परतफेड मणभर मदत करून करतात. यांचा अनुभव माझ्यासह संपूर्ण जिल्हाने घेतला आहे. असे प्रतिपादन भाजपचे सातारा जिल्हा अध्यक्ष धैर्यशील कदम यांनी केले. महाबळेश्वर येथील मौजे मेटगुताड या ठिकाणी भाजपच्या पदाधिकारी, कार्यकर्ता मेळाव्यात धैर्यशील कदम बोलत होते.

यावेळी आमदार मकरंद पाटील, भाजपचे सरचिटणीस बलशेठवार, वाई विधानसभा संयोजक अजय मांढरे,




जिल्हा बँकेचे संचालक राजेंद्र राजपुरे, कार्यकारणी सदस्य संतोष कवी, मंगेश उपाध्याय, रविंद्र कुंभारदरे , शिवसेना नेते प्रवीण भिलारे, अनिल लांगी, भाजप महिला जिल्हा उपाध्यक्ष उषा ओंबळे, महाबळेश्वर तालुका प्रभारी शेखर भिलारे, महाबळेश्वर महिला तालुका अध्यक्षा वैशाली भिलारे, मंडळ सरचिटणीस मिथुन तळवलकर, काम गार मोर्चा पश्चिम महाराष्ट्र सरचिटणीस सनी मोरे, ता.उपाध्यक्ष विजय बिरामणे शहर अध्यक्ष प्रशांत भोईटे, युवा अध्यक्ष रवींद्र शिंदे, राजेंद्र पवार, अखिल परदेशी, महेंद्र परदेशी, ओंकार दीक्षित, चिन्मय आगरकर उपस्थित होते.

मकरंद पाटील म्हणाले, भाजप शिस्तबध्द पार्टी आहे. प्रत्येक कार्यकर्ता दिलेली जबाबदारी प्रामाणिकपणे पार पाडतो. महायुतीचे सरकार अतिशय सक्षमपणे काम करते. सरकारचा निर्णय घराच्या चुलीपर्यंत येतो. या सारखे सरकार नाही. आपल्या मतदारसंघातील १७५००० भगिनी पैकी १०७००० भगिनींच्या नावावर लाडकी बहीण योजनेचे पैसे आले आहेत. सरकारने शेतकऱ्यांना कर्जमाफी दिली आहे. तुम्ही ची कुठलीही कामे असू द्या कुठल्याही संकोच न करता माझ्याकडे या त्या प्रत्येक कामाला न्याय देऊन प्रत्येक काम १०० टक्के करणारच. यावेळी राजेंद्र राजपुरे म्हणाले मकरंद आबा यांचे कार्य खूप मोठा आहे. धर्म, जात, गट या गोष्टी आबांनी कधीच मानल्या नाहीत. शहर आणि ग्रामीण भागातील भाजपाची सगळी मते मकरंद आबा यांनाच पडणार याची आम्हाला खात्री आहे. तसेच अजय मांढरे म्हणाले मकरंद पाटील विजयाचा चौकार नक्की मारतील. आबा यांच्याकडे जसं राष्ट्रवादीचे पालकत्व आहे. तसेच आता महायुतीचे सुद्धा पालकत्व आले आहे. यावेळी महाबळेश्वर तालुक्यातील भारतीय जनता पार्टीचे सर्व पदाधिकारी कार्यकर्ते उपस्थित होते.

## स्वीप अंतर्गत पालशेत येथे पथनाट्याच्या माध्यमातून मतदार जनजागृती

**अक्षराज : उदय दणदणे**

**दि.११, गुहागर :** विधानसभा सार्वत्रिक निवडणूक २६४ गुहागर विधानसभा मतदार संघा अंतर्गत स्वीप उपक्रमा अंतर्गत निवडणूक निर्णय अधिकारी तसेच सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी, गटशिक्षणाधिकारी रायचंद गळवे,शिक्षण विस्तार अधिकारी केशव शिरसागर, केंद्र संचालक नामदेव लोहकरे यांच्या मार्गदर्शनाखाली गुहागर तालुक्यातील प्राथमिक शिक्षकांनी पालशेत येथे पथनाट्याद्वारे मतदारांना मतदान आवाहन, मतदान विषयक जनजागृती केली.

नागरिकांनी लोकशाहीवर निष्ठा ठेवून आपल्या देशाच्या लोकशाही परंपरेचे जतन करून स्वातंत्र्यपूर्ण वातावरणातील निवडणुकांचे पावित्र्य राखून निवडणुकीत निर्भयपणे तसेच धर्म, वंश, जात, समाज, भाषा यांच्या विचारांच्या दबावाखाली न येता किंवा कोणत्याही



प्रलोभनाला बळी न पडता मतदान करावे म्हणून सदर पथनाट्यातून पालशेत या ठिकाणी पथनाट्याचे आयोजन करण्यात आले होते. पथनाट्याचे लेखन व दिग्दर्शन तुषार लोहार यांनी केले.

दोन पथनाट्यामध्ये तुषार लोहार, विनोद कदम, श्रीराम चव्हाण, अक्षय लोखंडे, योगेश चिडे, विशाल पवार, रूपाली पठारे, विशाखा पवार, आरती नरके, पूजा मेत्रे, अर्जुन किन्हाळकर, कुलदीप शरणागत, राहुल सातपुते, अर्जुन सावंत, अविनाश ढवळे, चितळे सर, संगीता फराड, अंजुम शेख, सुषमा गायकवाड, धन्वंतरी मोरे, सोनाली गायकवाड, स्वाती गणेशकर आदी कलाकारांनी सक्रिय भाग घेऊन मतदारांना मत देण्याबाबत साद घातली.

सदर प्रसंगी शिक्षण विस्तार अधिकारी केशव क्षीरसागर, केंद्रप्रमुख महेंद्र देवळेकर, पंचायत समिती विषय शिक्षक साखरे सर, गुहागर तालुका अपंग कर्मचारी संघटनेचे अध्यक्ष दशरथ कदम, गुहागर तालुका अखिल प्राथमिक शिक्षक संघाचे अध्यक्ष मनोज पाटील, प्राथमिक शिक्षक समितीचे माजी सरचिटणीस नरेंद्र देवळेकर, शिक्षक संघ गुहागर तालुकाचे अध्यक्ष रवींद्र कुळे, आदर्श शिक्षक दिनेश जागकर, तंत्रस्नेही शिक्षक प्रताप देसले व नागरिक तसेच गुहागर तालुक्यातील सर्व नवनियुक्त शिक्षक उपस्थित होते. पथनाट्यातून मतदान जागृती केल्याबद्दल ग्रामस्थांकडून समाधान व्यक्त केले जात आहे

## स्वीप कार्यक्रमांतर्गत पथनाट्याद्वारे मतदान करण्याचे आवाहन

**अक्षराज : जे. के. पोळ**

**दि.११, नवी मुंबई :** विधानसभा निवडणुकीत मतदानाची टक्केवारी वाढण्यासाठी स्वीप कार्यक्रमांतर्गत विविध उपक्रम राबविले जात असून नवी मुंबई महानगरपालिकेच्या वतीने पथनाट्यासारख्या लोकप्रिय माध्यमाचा आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली प्रभावी वापर करण्यात येत आहे. मतदान करणे हा प्रत्येक नागरिकाचा लोकशाहीने दिलेला अधिकार असून तो कर्तव्य समजून बजवावा याकरिता पथनाट्यातून प्रबोधन करण्यात येत आहे. याम ध्ये ६ कलावंतांचा समूह महानगर



पालिका क्षेत्रात वर्दळीच्या ठिकाणी जाऊन सोबत असलेली वाद्य वाजवत लोकांना एकत्र करत असून त्यानंतर आपल्या मतदार राजा जागा हो पथनाट्याचे सादरीकरण करत आहे.

रविवारी सार्वजनिक सुट्टीचा दिवस लक्षात घेऊन नागरिक कुटुंबासमवेत एकत्रितपणे फिरायला बाहेर पडतात हे लक्षात घेऊन पथनाट्य समुहाने ऐरोली विभागात गणेश तलावाजवळ तसेच ऐरोली रेल्वे स्टेशन परिसर आणि सेक्टर ५ येथील मध्यवर्ती चौक याठिकाणी पथनाट्याचे सादरीकरण केले. हे पथनाट्य पाहण्यासाठी थांबलेल्या उपस्थित नागरिकांसमवेत पथनाट्य झाल्यानंतर मतदान प्रतिज्ञा घेण्यात आली व नागरिकांना २० नोव्हेंबर रोजी विधानसभा निवडणुकीत मतदान करण्याचे आवाहन करण्यात आले.

यापुढील काळात अशाच प्रकारे महापालिका क्षेत्रात विविध विभागांमध्ये नागरिक मोठ्या संख्येने एकत्र येत असतात अशा ठिकाणी पथनाट्याचे सादरीकरण करुन मतदानाचे महत्व पटवून दिले जात आहे तसेच मतदान करण्याचे आवाहन करण्यात येत आहे.

# न्यूमोनिया : अरे बापरे, बाप ! फुफ्फुसात पाणी !

जागतिक न्यूमोनिया दिनाविषयी मुख्य तथ्ये- जागतिक न्यूमोनिया दिनाचा उद्देश जगभरातील लोकांमध्ये न्यूमोनियाबद्दल जागरूकता पसरवणे हा आहे. जागतिक न्यूमोनिया दिवस २०२१ची थीम होती- न्यूमोनियाला थांबवा, प्रत्येक श्वास म हत्वाचा आहे. ही थीम जगाला न्यूमोनियामुक्त करण्यावर भर देते. जागतिक न्यूमोनिया दिवस हा सार्वजनिक आरोग्य समस्या दूर करण्यासाठी तसेच न्यूमोनियाचे गांभीर्य अधोरेखित करण्यासाठी आणि रोगाशी लढण्यासाठी मार्ग शोधण्यासाठी त्याचबरोबर अधिक संस्था/देशांना प्रोत्साहित करण्यासाठी हा दिवस साजरा केला जातो. हा दिवस सर्वप्रथम ग्लोबल कोलिशन अगेन्स्ट चाइल्ड न्यूमोनिया द्वारे आयोजित करण्यात आला होता. जो समस्येचे निराकरण करण्यासाठी सार्वजनिक आणि राजकीय सहकार्य निर्माण करण्यात मदत करण्यासाठी तयार करण्यात आला होता. दरवर्षी हा दिवस साजरा करण्यासाठी १२ नोव्हेंबर निवडण्यात आला आहे. जागतिक न्यूमोनिया दिन दि.१२ नोव्हेंबर २००९ रोजी प्रथमच साजरा करण्यात आला. संयुक्त राष्ट्रांनी १२ नोव्हेंबर २००९ रोजी पहिला जागतिक न्यूमोनिया दिवस जगभरात साजरा केला.

शरीर चांगले ठेवणे हे प्रत्येकाचे आद्य कर्तव्य आहे, अन्यथा आपण आपले मन मजबूत आणि स्वच्छ ठेवू शकणार नाही. कितीही मालदार असलो तरी चांगले आरोग्य हे आपण विकत घेऊ शकत नाही. तथापि, ते एक अत्यंत मौल्यवान बचत खाते असू शकते. न्युमोनियाविरुद्धच्या लढाईत आम्ही आमची आशा सोडण्यास खूप मजबूत आहोत. दरवर्षी १०० हून अधिक संस्था एकत्र येऊन बाल न्यूमोनिया विरुद्ध ग्लोबल युती तयार करतात आणि न्यूमोनियाशी संबंधित मृत्यूंबद्दल जागतिक जागरूकता निर्माण करतात. जागतिक आरोग्य संघटना- डब्ल्यूएचओ युनायटेड नेशन्स चिल्ड्रन्स फंड- युनिसेफने न्यूमोनिया आणि डायरियाबद्दल जागतिक जागरूकता निर्माण करण्यासाठी कृती योजना जाहीर केली होती. त्यांनी प्रत्येकी हजार जीवांचे लक्ष्य ठेवले, मुलांमध्ये न्यूमोनियामुळे ३ पेक्षा कमी मृत्यू झाले. लहान मुलांमध्ये न्यूमोनियाच्या प्रतिबंधासाठी लसीकरण हाच एक सुरक्षित उपाय आहे.

त्याशिवाय नवजात बालकांना पहिल्या सहा महिन्यांपर्यंत मातेने स्तनपान देणे, लहान मुलांच्या संपर्कात धूम्रपान टाळणे, तसेच मुलांना पोषक आहारासह प्रदूषण नसलेल्या मोकळ्या हवेत नेणे, याद्वारेही बालकांना होणारा न्यूमोनिया टाळण्यासाठी मदत होऊ शकेल, असे मत जागतिक न्यूमोनिया दिनानिमित्त वैद्यकीय तज्ज्ञांनी व्यक्त केले. पुढील लक्षणांद्वारे न्यूमोनिया ओळखू शकतो- हिरवा किंवा पिवळा खोकला किंवा अगदी रक्तरंजित श्लेष्मा, जेव्हा तुम्ही खोकता किंवा खोल श्वास घेता तेव्हा छातीत तीक्ष्ण किंवा तीव्र वेदना होतात, कमी ऊर्जा जाणवणे किंवा भूक न लागणे, घाम येणे, थंडी वाजणे आणि ताप येणे, जलद, उथळ श्वास घेणे, शरीराचे तापमान कमी होणे, श्वास घेण्यात अडचण होणे.

पुढील मार्गांनी डॉक्टरांना भेट देऊन न्यूमोनियाचे निदान करू शकतो- छातीचा एक्स-रे, रक्त संस्कृती, थुंकी संस्कृती, नाडी ऑक्सिमेट्री, सीटी स्कॅन, द्रव नमुना, ब्रॉन्कोस्कोपी आदी रिपोर्टसह. न्यूमोनियाची लक्षणे- न्यूमोनिया हा कोणत्याही वयोगटातील व्यक्तीला होण्याची शक्यता असते. श्वासोच्छवासात अडथळा निर्माण होणे. जोरजोरात आणि कमी श्वास घेणे. हृदयाच्या ठोक्यांचे प्रमाण वाढणे. ताप, अंगात थंडी भरणे आणि खूप घाम येणे. कफ, छातीत दुखणे, नॉशिया, उलट्या होणे किंवा डायरिया. तज्ज्ञ सांगतात, की न्यूमोनियाची लक्षणे तात्काळ ओळखणे उपचारांसाठी अत्यंत महत्त्वाचे असते. फुफ्फुसविकारतज्ज्ञ डॉ.सलिल बेंद्रे सांगतात, प्रत्येक प्रकारचा न्यूमोनिया जीवघेणा नसतो. पण, याचे निदान योग्यवेळी आणि उपचार तात्काळ सुरू होणे अत्यंत महत्त्वाचे आहे. जागतिक आरोग्य संघटनेने दिलेल्या माहितीनुसार, जिवाणू आणि विषाणूंमुळे झालेला न्यूमोनियाचा संसर्ग सारखाच दिसतो. पण याची लक्षणे वेगळी असतात. विषाणूंमुळे झालेल्या संसर्गात जास्त लक्षणं दिसून येतात. डॉ.बेंद्रे पुढे म्हणतात, न्यूमोनिया झालेल्या रुग्णांमध्ये पांढरा, हिरवा किंवा लाल रंगाचा कफ, ताप, अंगात थंडी भरणे आणि श्वास घेण्यास अडथळा ही लक्षणे सामान्यत: आढळून येतात.



न्यूमोनिया म्हणजे फुफ्फुसात विषाणू किंवा बॅक्टेरिया- जीवाणू किंवा बुरशीमुळे झालेला संसर्ग होय. बोलीभाषेत याला फुफ्फुसात पाणी होणं असंही म्हटलं जातं. न्यूमोनिया हा श्वसनमार्गाचा आजार आहे. लहान मुलांपासून ज्येष्ठ नागरिकांपर्यंत कोणालाही न्यूमोनियाचा त्रास होऊ शकतो. जागतिक आरोग्य संघटनेच्या माहितीनुसार सन २०१९मध्ये जगभरात पाच वर्षाखालील ७ लाख ४० हजार मुलांचा न्यूमोनियामुळे मृत्यू झाला होता. कोव्हिड-१९ विषाणू संसर्गामुळे कोरोनाकाळात लाखो रुग्णांना कोव्हिड-न्यूमोनियाचा त्रास झाला. यामुळे काही रुग्णांना आपले प्राण गमवावे लागले.

सोप्या भाषेत सांगायचं झालं तर न्यूमोनिया हा श्वसनमार्गाचा आजार आहे. विषाणू, जीवाणू किंवा बुरशी संसर्गामुळे फुफ्फुसांमध्ये संसर्ग होतो. न्यूमोनियाचा संसर्ग सौम्य किंवा काही प्रकरणांमध्ये जीवघेणा ठरतो. म्हणून सर्वांनी दक्षता बाळगून आपल्या आरोग्याची वेळोवेळी काळजी घेतली पाहिजे, हीच याद्वारे कळकळीची विनंती!

**!! आंतरराष्ट्रीय न्यूमोनिया दिनाच्या सर्वांना दक्षतावर्धक हार्दिक हार्दिक शुभेच्छा जी !!**

**- संकलन -**

**श्री.एन.कृष्णकुमार जी. गुरूजी.**
**रामनगर, गडचिरोली, जि. गडचिरोली**
**फक्त व्हॉट्सॲप- ९४२३७१४८८३**

# कराड-चिपळूण रस्त्यावरील धुरळाच सांगतोय पाटण तालुक्याचा विकास

**अक्षराज : सुरेश संकपाळ**

**दि.११, पाटण (कराड) :** चिपळूण रस्त्यावरील पाटण ते संगमनगर धक्का, घाटमाथा हा रस्ता गेली आठ वर्षे प्रवाशांच्या दृष्टीने वेदना दायी ठरला आहे. या रस्त्याच्या सतत होणाऱ्या निकृष्ट कामाबाबत लोकांनी, सामाजिक संस्थांनी, राजकीय पक्षांनी अनेकदा आंदोलने केली. वेळ प्रसंगी भर पावसात रस्ता रोको, आमरण उपोषण देखील केले.

या सर्वांना रस्ता दुरुस्तीसाठी पंधरा दिवस, एक महिना अशी फक्त अश्वासने मिळाली. या अश्वासनात रस्त्यावर पडलेले जिवघेणे खड्डे केवळ मुरुम-खडीने भरण्या पलिकडे काही झाले नाही. भरलेले खड्डे देखील ऐवढे उध्वस्त झाले आहेत. की सद्या पाऊस बंद झाला असला तरी या रस्त्यावर वाहतूकीने प्रचंड उडणारा धुरळा प्रवाशांना असाह्य झाला आहे. यामुळे या रस्त्यावर अपघातांची मालिका सतत सुरू आहे. ऐन निवडणुकीच्या तोंडावर प्रचाराचा धुरळा उडत असताना या रस्त्यावरून प्रवास करणारा प्रत्येक प्रवासी धुरळाच सांगतोय पाटण तालुक्याचा विकास.. अशा तिखट प्रतिक्रिया बोलत आहे.

बांधकाम विभागाच्या नाकर्तेपणामुळे या रस्त्यावर अनेक अपघात झाले आहेत. अनेकांचे प्राण गेले आहेत.



अनेकांना कायमस्वरूपी अपंगत्व आले आहे. वाहनांचे मोठे नुकसान झाले आहे. अपघातात मोठ्या प्रमाणात वाढ झाली आहे. अनेक अपघात प्रवाशांच्या जीवावर बेतले आहेत. आजारी रुग्णांवर रस्त्या अभावी वेळेवर उपचार होत नसल्याने त्यांना ही प्राणास मुकावे लागत आहे. या सर्वांना पाटण ते हेळवाक, घाटमाथा हा रस्ता कारणीभूत आहे. यामुळे मागील ८ वर्ष रस्त्याचे काम रखडत ठेवलेल्या संबंधित अधिकारी, ठेकेदार कंपनी वरती मनुष्य वधाचा गुन्हा दाखल झाला पाहिजे.

यांची नुकसान भरपाई शासनाने दिली पाहिजे. या मागणीसाठी माजी प.स. सदस्य बबनराव कांबळे यांनी आंदोलनात सातत्य ठेवून रस्त्याच्या कायमस्वरूपी दुरुस्तीसाठी आंदोलन केले आहे. या आंदोलनाला शासनाने तिलांजली दिली आहे.

रस्त्याच्या निकृष्ठ कामाविरोधात रामापुर पाटण या ठिकाणी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे तालुकाध्यक्ष गोरख नारकर यांचे नेतृत्वाखाली कार्यकर्त्यांनी सप्टेंबर मध्ये चार दिवसांचे आमरण उपोषण देखील केले.

गुहागर विजयपुर राष्ट्रीय महामार्गाचे निकृष्ठ दर्जाचे काम झालेले आहे. पाटण ते हेळवाक-घाटमाथा इथून प्रवास करणे म्हणजे मरणयातना भोगणे आहे. जागोजागी पडलेले खड्डे अनेक अपघातांना निमंत्रण देत आहेत. राष्ट्रीय महामार्ग निव्वळ पोकळ आश्वासने देत आहे तर स्थानिक प्रशासन दुसऱ्याकडे बोट दाखवून गाफिल आहे. रस्त्याचे काम त्वरित सुरु करा या मागणीसाठी आमरण उपोषण सुरू होते.

शासनाच्या संबंधित विभागाने मागणी प्रमाणे या आंदोलकांना लेखी आश्वासने दिली मात्र प्रत्येक्षात रस्त्याची दुरवस्था काही सुटली नाही. निवडणूका सुरू असल्याने या रस्त्याकडे पहायला शासकीय यंत्रणेला सध्या वेळ नसला तरी निवडणूकासंपल्यानंतर तरी रस्त्याचे काम सुरू होतय का नाही..? असा प्रश्न प्रवाशांना डोळ्यासमोर असताना असेच धुरळ्याचे लोट अंगावर घेत जिवघेण्या रस्त्यावरुन प्रवास करावा लागणार हे सांगता येत नाही.

# आरोप करणारे कोरोना काळात कुठे होते ? खासदार नीलेश लंके यांचा सवाल

## माजी खा.सुजय विखे यांच्यावर घणाघाती टीका; वाळवणे येथे सुपा जिल्हा परिषद गटातील प्रचाराचा शुभारंभ

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.११, पारनेर (अहिल्यानगर) :** एकाच घरात दोन उमेदवारीचा आरोप करणारे कोरोना काळात कुठे होते ? असा सवाल करीत आपली लढत ज्या पक्षाच्या उमेदवाराशी आहे. त्या पक्षाने नादी लावण्यासाठी एकाला उमेदवारी दिली आहे. त्या उमेदवाराला गावे सापडेपर्यंत निवडणूक संपणार आहे. आजपर्यंत अनेक गावात उमेदवार पोहचलेही नाहीत.

आम्ही प्रत्येक गावात तिनदा पोहचलो आहोत. निवडणूकीपुरते भुछत्राप्रमाणे उगवणारे, ऐनवेळी मतदारांसमोर जाणारे मतदार कधीही स्विकारत नसल्याचा घणाघात खा. लंके यांनी केला. महाविकास आघाडीच्या उमेदवार राणी लंके यांच्या प्रचारार्थ सुपा जिल्हा परिषद गटाच्या प्रचाराचा नारळ वाळवणे येथील श्री काळभैरवनाथांना अर्पण करण्यात आला. त्यानंतर झालेल्या सभेत खा. लंके हे बोलत होते. कोरोना काळात नीलेश लंके



प्रतिष्ठान, राष्ट्रवादी काँग्रेसच्या कार्यकर्त्यांसह आमचे कुटुंब दिवसरात्र कोरोना रुग्णांच्या सेवेसाठी झटत होते. महामारीशी झुंजत होते. त्याकाळातील आणि इतर वेळेचे काम पाहून जनतेने मागणी केल्यामुळे उमेदवारी घ्यावी लागली. ही लादलेली उमेदवारी नाही हे मतमोजणीतून स्पष्ट होईल असे खासदार लंके म्हणाले. खा. लंके पुढे म्हणाले,महाविकास आघाडीने पंचसुत्री प्रसिध्द केली आहे.

महिलांना ३ हजार रुपये, शेतकऱ्यांचे तीन लाख रूपयांपर्यंतो कर्ज माफ. नियमित कर्ज भरणाच्या शेतकऱ्यांना ५० हजार प्रोत्साहनपर मदत, सर्वांना २५ लाख रूपयांचे आरोग्य सुरक्षा कवच, बेरोजगारांसाठी ४ हजार रूपये हा महाविकास आघाडीचा अजेंडा असल्याचे खा.लंके म्हणाले.

यावेळी माधवराव लामखडे,प्रसिद्ध व्याख्याते यशवंत गोसावी, वसंत ठोकळ, बाबाजी तरटे, युवराज गाडे, कारभारी पोटघन, सचिन पठारे, सुवर्णा धाडगे, प्रियंका खिलारी, सुरेखा पवार, पुनम मुंगसे, बापूसाहेब शिर्के, राजेश्वरी कोठावळे, जयसिंग मापारी यांच्यासह सुपा जिल्हा परिषद गटातील विविध गावचे सरपंच, चेअरमन, महाविकास आघाडीचे पदाधिकारी, कार्यकर्ते ग्रामस्थ यावेळी उपस्थित होते. विधानसभा निवडणुकीमध्ये काही अपक्ष उमेदवारांनी प्रवरेचे टेंडर भरले आहे. लोकसभा निवडणूकीत आपण पराभूत केले म्हणून लोणी वाल्यांनी आता ही पॅकेजवर गंमत सुरू केली आहे. म्हणतात ना, सुंभ जळाला तरी पिळ जळत नाही अशी लोणीकरांची अवस्था झाली आहे. यावेळी बोलताना खा. लंके म्हणाले, प्रत्येक गावात जास्तीत जास्त मताधिक्य मिळेल यासाठी प्रयत्न करा. लोकसभेला घराघरात जाऊन प्रचार केला तर चांगले यश मिळाले. लोकसभा निवडणूक ही सराव परीक्षा होती, आता वार्षिक परीक्षा म्हणून विधानसभा निवडणुकीकडे पहा. या निवडणुकीत सुपा गटात सर्वाधिक मताधिक्य मिळाले पाहिजे. कारण या गटापासून आपण आपल्या राजकीय प्रवासाला सुरुवात झाली आहे.

### राणी लंके १ लाखांनी विजयी होणार !

खरा शिवसैनिक असेल त्याने उध्दव ठाकरे यांना ज्या पद्धतीने बाहेर काढण्यात आले, ज्या शरद पवारांना या वयात दुःख दिले, त्याचा बदला घेण्याची वेळ आली आहे. राज्यात महाविकास आघाडीचे सरकार येणार आहे. आपल्या मतदारसंघात महाविकास आघाडीचा उमेदवार किमान एक लाख मतांनी विजयी होणार असल्याची ग्वाही खा. लंके यांनी यावेळी दिली.

# पक्षाने काढुन टाकले तर काय झाले जनतेच्या हृदयात आहे - व्यंकटराव पाटील गोजेगावकर

## मुखेड वासियांचा खतगावकर यांना जाहीर पाठिंबा

**अक्षराज : अशोक कुलकर्णी**

**दि.११, मुखेड (नांदेड) :** मुखेड विधानसभा मतदासंघातील अपक्ष उमेदवार बालाजी पाटील खतगावकर यांची नुकतीच मुक्रमाबाद येथे भव्य प्रचार सभा पार पडली. यावेळी तालुक्यातील हजारोंचा जनसमुदाय सभेला पाठींबा देत उपस्थित होता. त्यामुळं आता पक्षातील सर्वच उमेदवारांच्या चींतेमध्ये वाढ झालेली दिसून येत आहे.दरम्यान बालाजी पाटील बोलताना म्हणाले की, गेली ३० ते ४० वर्षापासून मुक्रमाबाद येथील लेंडी धरणाच काम रखडलेल असून आजपर्यंत होऊ घातलेल्या लोकप्रतिनिधीने याकडे दूर लक्ष केल्यामुळे हा प्रकल्प होऊ शकला नाही. याबद्दल मला खंत वाटते. या कामाला जर चाळीस वर्षे लागत असतील तर त्या पुनर्वसीत गावच्या लोकांचं झालेल्या नुकसान भरपाई कोण करणार, याबाबत कोणी विचार केलाय काय याला कोण जबाबदार आहे ? तसेच धरण वेळीच पूर्ण झालं असतं तर आज तालुक्यातील हजारो एकर जमीन बागायती खाली आली असती.

दोन-चार साखर कारखाने या ठिकाणी उभे राहिले असते. स्थलांतराच प्रमाण कमी झालं असतं सुशिक्षित बेकारांना हाताला काम मिळाले असते. अशा काही बऱ्याच गोष्टी आहेत की ते शब्दात सांगता येत नाही. असे मत व्यक्त करून रखडेल्या लेंडी धरणाचे काम पूर्ण केल्याशिवाय स्वस्थ बसणार नाही असे आश्वासन बालाजी पाटील यांनी जनतेला दिले आहे.

या मेळाव्याचे आयोजन व्यंकटराव पाटील गोजेगावकर यांनी केले होते या मेळाव्यामध्ये बंजारा समाजातील काही महिला त्यांच्या पारंपारिक वेशभूषेमध्ये वाजत गाजत मेळाव्याच्या व्यासपीठावर येऊन बालाजी पाटील तुम आगे बढो हम तुम्हारे साथ है असी घोषणा देत बालाजी पाटील याना पाठिंबा दिला आहे.यावेळी व्यंकटराव पाटील गोजेगावकर पुढे म्हणाले की पक्ष माझ्यासोबत नसला तर काय झालं ? इथे जमलेली जनता माझ्या पाठीशी खंबीरपणे उभी आहे मला चिंता करण्याची गरज नाही मी कुणाशी बेईमानी केली नाही माझ्यासोबतच बेईमानी झालेली आहे अशी टीका त्यांनी विरोधकाला केली आहे. मुखेड तालुक्याचा म्हणावा तेवढा विकास झालेला नाही आता बालाजी पाटील खतगावकर एक चांगला उमेदवार म्हणून आपणास लाभलेला आहे.

या उमेदवाराला बहुमताने विजय करून विधानसभेत पाठवायचा आहे तरी येणाऱ्या २० तारखेला शिलाई मशीन हे बटन दाबून बालाजी पाटील खतगावकर यांना बहुमताने विजयी करावं असे आव्हान व्यंकटराव पाटील गोजेगावकर यांनी मतदार बंधूंना केलं आहे.तसेच शेतकरी संघटनेचे नेते गुणवंतराव पाटील हंगरगेकर, पुढे



म्हणाले की, मी आत्तापर्यंत लेंडी धरणासाठी जे प्रयत्न केले आहे त्याचा मोबदला कोणाला मागितलं नाही परंतु आता मी बालाजी पाटील खतगावकर यांच्यासाठी हात पसरत आहे की अकरा गावच्या लोकांनी बालाजी पाटील खतगावकर यांच्या शिलाई मशीनचे बटन दाबून बालाजी पाटलांना बहुमताने विजयी करावे अशी विनंती केली आहे.यावेळी माजी पंचायत समिती सभापती अशोक पाटील रावीकर, सुरेश सावकार पंदीलवार, व्यंकटराव पाटील टेंभुरणे, मुक्रमाबादचे सरपंच प्रतिनिधी बालाजी आप्पा बोधने, हणमंत मामा वाडीकर, सह आदी मान्यवर बालाजी पाटील खतगावकर यांना प्रचंड बहुमताने विजयी करून विधानसभेत पाठवावे असी विनंती केली आहे. मेळाव्याचे आयोजन बबन पाटील गोजेगावकर, यांनी केले तर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्राध्यापक ठाणेकर आणि आभार रजाक कुरेशी, यांनी केले आहे.

# कामगारांना मतदानाच्या दिवशी मतदानासाठी सुट्टी

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.११, यवतमाळ :** राज्यात विधानसभेसाठी दि.२० नोव्हेंबर रोजी मतदान होणार आहे. या निवडणुकीमध्ये सर्वांना मतदानाचा हक्क बजावता यावा यासाठी या दिवशी सुट्टी घोषित करण्यात आली आहे. राज्यातील सर्व कामगारांना मतदान करता यावे, यासाठी त्यांना देखील सुट्टी राहणार आहे. निवडणूक होणाऱ्या मतदान क्षेत्रातील कोणताही व्यवसाय, व्यापार, औद्योगिक उपक्रम किंवा इतर कोणत्याही आस्थापनेमध्ये कार्यरत असलेल्या आणि मतदान करण्याचा अधिकार असलेल्या प्रत्येक व्यक्तीला, मतदानाच्या दिवशी सुट्टी राहील. सदर सुट्टी सर्व उद्योग समूह, महामंडळे, कंपन्या व संस्था, औद्योगिक उपक्रम किंवा इतर आस्थापना इत्यादींना देखील लागू राहील. शासन परिपत्रकानुसार विधानसभा मतदार संघातील सर्व कामगार, कर्मचारी मतदारांना मतदानाच्या दिवशी मतदान करण्याकरीता भरपगारी सुट्टी देण्यात यावी, असे नमुद आहे. अपवादात्मक परिस्थितीत कामगार, अधिकारी, कर्मचारी इत्यादींना पुर्ण दिवस सुट्टी देणे शक्य नसेल तर मतदान क्षेत्रातील कामगारांना मतदानाचा हक्क बजावण्यासाठी सुट्टी ऐवजी कमीत कमी दोन तासांची सवलत देणे आवश्यक आहे. मात्र त्याबाबत जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी यांची पूर्व परवानगी घेणे आवश्यक आहे.

# थोडक्यात

## महाविकास आघाडीच्या उमेदवारावर तामसा शहरातील दलीत बांधवांचा नाराजीचा सुर

**अक्षराज : बालाजी गायकवाड**

**दि.११, हदगांव (नांदेड) :** हदगांव तालुक्यातील तामसा शहरामध्ये विद्यमान आमदार माधवराव पाटील जवळगावकर यांनी अनेक विकास कामे केले. परंतु तामसा शहरांमध्ये अनेक गल्ली गल्लीत दलित वस्ती व इतर या ठिकाणी पेवर ब्लॅकचे काम अतिशय बोगस झाले असून तामसा येथील ग्रामपंचायत माझी सरपंच बालाजी महाजन महाविकास आघाडीचे असता यावेळी दलित बांधवांना विश्वस्तात न घेता सदरील कामे आपल्या सोयी नुसार केल्यामुळे कामाचा दर्जा खालावला आहे. त्यामुळे तामसा शहरातील दलीत बांधव व इतर समाज माझी सरपंच बालाजी महाजन यांच्यावर नाराज असल्यामुळे महाविकास आघाडीचे अधिकृत उमेदवार माधवराव पाटील जवळगावकर यांना होवू घातलेल्या विधानसभेच्या निवडणुकीमध्ये तामसा शहरातील दलीत वस्तीमधील नागरिकांचे मत महविकास आघाडीच्या उमेदवाराला मिळण्याची कमी शक्यता नाकारता येत नाही. काँग्रेस पक्षाकडून त्यांना उमेदवारी मिळाली तरी त्यांचे माझी नेते अशोकराव चव्हाण हे भाजपमध्ये गेल्यामुळे माधवराव पाटील जवळगावकर यांच्यावर जनता विश्वास ठेवते की नाही असा संशय निर्माण होत आहे. माजी सरपंच बालाजी महाजन यांनी लोकांची दिशाभूल केल्यामुळे विद्यमान आमदार माधवराव पाटील जवळगावकर यांच्यावर राजकारण करीत खोटे बोलणे जनतेची दिशाभूल करणे त्यामुळे बालाजी महाजन यांच्यावर जनता आज घडीला नाराज असल्याचे उघडपणे दिसून येत आहे. त्यामुळे विद्यमान आमदार माधवराव पाटील जळगावकर यांच्या विजयाला धोका पोहोचण्याची शक्यता वाटते.

## पानगाव येथे कपिलधार पदयात्रेचे स्वागत



**अक्षराज : उमेश जोशी**

**दि.१०,पानगाव (लातूर) :** राष्ट्रसंत वसुंधरारत्न डॉ शिवलिंग शिवाचार्य महाराज यांनी ७०वर्षा पुर्वी चालु केलेली अहमदपुर ते मन्मथस्वामी (कपीलाधार) पदयात्रा अजुनही अंखडपणे सुरु असुन उत्तराधिकारी प्र.ब्र.१०८ राजशेखर गुरु शिवलिंग शिवाचार्य महाराज यांच्या उपस्थितीत ही पदयात्रा गुरुवार, दि.७ नोव्हेंबर रोजी भक्तीस्थळ येथुन निघाली असुन रविवार, दि.१० नोव्हेंबर रोजी सायंकाळी ६ वाजता आण्णाभाऊ साठे चौकात येताच फटाक्यांची आतीषबाजी करत टाळ मृदंगाच्या तालात मुखाने गुरुराज माऊलीचा जयघोष करत दारोदारी सडा रांगोळी काढुन महीलांनी औक्षवण केले. सोमवार, दि.११ नोव्हेंबर रोजी सकाळी महापदयात्रा बिड जिल्ह्यात मार्गस्थ झाली.मागील ७० वर्षा पासुन अखंडपणे सुरु असलेली भक्तीस्थळ ते मन्मथ स्वामी महापदयात्रा याही वर्षी गुरुवार, दि.८ रोजी भक्तीस्थळ येथुन सुरुवात करण्यात आली असुन ही पदयात्रा चापोली,चाकुर,वडवळ जानवळ,कारेपुर मार्गे रविवार, दि.१० नोव्हेंबर रोजी सायंकाळी ६ वाजता राष्ट्रसंत डॉ.शिवलिंग शिवाचार्य महाराज यांच्या पादुका असलेला रथ व ऊत्तराधिकारी प्र.ब्र.१०८ राजशेखर गुरु शिवलिंग शिवाचार्य महाराज यांचे आगमन होताच फटाक्यांची आतिषबाजी करण्यात आली.अण्णाभाऊ साठे चौकापासुन महात्मा बसवेश्वर मंदिरा पर्यंत महीलांनी दारात रांगोळी काढुन औक्षवण करुन पुष्प वृष्टी केली. यावेळी ऊपस्थित मान्यवरांच्या हस्ते महात्मा बसवेश्वर महाराजाच्या प्रतिमेचे पुजन करण्यात आले.

यावेळी विचारपीठावर प्र.ब्र.१०८ राजशेशखर गुरु शिवलिंग शिवाचार्य महाराज,शंकरलिंग शिवाचार्य महाराज,संगम बस्व महास्वामी शिवाचार्य महाराज,राजु महाराज (तेलंगणा), संतोष महाराज,बालानंद महाराज,वेदमुर्ती बस्वराज सोमशंकर महाराज,राजलिंग महाराज,भक्ती स्थळ समितीचे अध्यक्ष किर्तन केसरी भगवंतबाबा पाटील आदी ऊपस्थित होते. यावेळी आशिर्वचनात राजशेखर गुरु शिवलिंग शिवाचार्य महाराज बोलताना म्हणाले कि,कर्म -कर्तव्य व परंपरा पानगाव करांनी राखली असुन नामाचे चिंतन झाले पाहीजे .डॉ.शिवलिंग शिवाचार्य महाराज यांच्या कार्याचेही चिंतन झाले पाहीजे. आत्म्याला परमात्मा बनवने म्हणजेच जिवन होय.आप्पाचे जिवन रश्मी रथा प्रमाणे होते. मन्मथ माऊलीची माहीती समाजा पर्यंत अप्पांनी पोचवली .शिव किर्तनाची सुरुवात मन्मथ माऊली पासुन झाली.

अप्पांनी मोजकेच सहकारी सोबत घेवुन सुरु केलेली पदयात्रा आता महापदयात्रा झाली असुन या दिंडीत सहभागी होणार्या प्रत्येक भक्तामध्ये माऊलींचा वास आहे तेव्हा शिव संकृती जपा आचरण चांगले ठेवा सशक्तसमाज निर्मीतीसाठी चांगल्या संस्काराची गरज आहे असा ऊपदेश त्यांनी यावेळी दिला.यावेळी दिंडी प्रमुख मन्मथअप्पा पालापुरे,उध्दव महाराज,शंकरअप्पा येरुळे,निळकंठ बिराजदार,संजय ऊस्तुर्गे,शिवलिंग पाटील,कपील मल्लिशे,पानगाव सरपंच मिनाताई मोटाडे उपस्थित होते. यावेळी मुस्लिम बांधवानी राजशेखर महाराज यांचा सत्कार करुन हिन्दु मुस्लिम ऐक्याची जाणीव करुन दिली. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी पानगाव ग्रामस्थ व लिंगायत बांधवांनी परीश्रम घेतले तर यावेळी पोलीस बंदोबस्तही चोख ठेवण्यात आला होता. तर महावितरण कंपनीच्या कर्मचारी व अधिकारी यांनी विज पुरवठा सुरळीत ठेवुन भाविकांची गैरसोय होणार नाही. याची काळजी घेतली त्यामुळे पोलीस प्रशासन व महावितरण कंपनीचे महात्मा बसवेश्वर संस्थानच्या वतीने आभार व्यक्त करण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचलन बाबा हालकुडे तर आभार रवि उरगुंडे यांनी मानले.

## मतदानाच्या व त्या आधीच्या दिवशी वृत्तपत्रांतील जाहिरातींचे प्रमाणीकरण आवश्यक

**अक्षराज : वृत्तससंकलन**

**दि.११, अकोला :** कोणताही राजकीय पक्ष, निवडणूक उमेदवार, इतर कोणतीही संस्था किंवा व्यक्ती यांनी मतदानाच्या एक दिवस आधी आणि मतदानाच्या दिवशी वृत्तपत्रात राजकीय जाहिरात करावयाची असल्यास जाहिरातीचा मजकूर जिल्हा माध्यम प्रमाणीकरण संनियंत्रण समितीकडून (एमसीएमसी) पूर्व-प्रमाणित करुन घेणे आवश्यक आहे. विधानसभा निवडणुकीसाठी दि. २० नोव्हेंबर रोजी मतदान होणार आहे. त्यानुसार दि. १९ नोव्हेंबर आणि २० नोव्हेंबर रोजी वृत्तपत्रांत प्रसिद्ध होणा-या जाहिराती पूर्वप्रमाणित करून घ्याव्या लागणार आहेत. पूर्व-प्रमाणीकरणासाठी समितीकडे दोन दिवस आधी अर्ज सादर करावा लागतो. प्रमाणीकरणाचे अर्ज निवडणूक निर्णय अधिकारी कार्यालय, तसेच जिल्हा माहिती कार्यालयात उपलब्ध करून देण्यात आले आहेत. पूर्व प्रमाणित केल्याशिवाय कोणतीही जाहिरात दैनिके, मुद्रित माध्यमांमध्ये प्रकाशित करु नये, असे निर्देश भारत निवडणूक आयोगाने दिले आहेत.